# University of Mumbai

परीक्षा विभाग/वाणिज्य निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/वाणिज्य/६३२/२०१५

परिपत्रक :—

संचालक/प्रमुख, वाणिज्य विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षणक्रम विभाग, मुंबई विद्यापीठ, सर्व प्राचार्य/संचालक विद्यापीठाशी संलग्नीत असलेले वाणिज्य विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम चालविणारी महाविद्यालय व सहायक कुलसचिव रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र, यांना सुचित करण्यात येते की, वाणिज्य विद्याशाखेतील M.Com. (Sem.IV) पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी पात्रता विद्यापीठ अध्यादेश — ५९८२ खालील प्रमाणे नमुद आहे :—

**O.5982 : - However, no learner will be allowed to appear for Semester-IV examination, unless he/she has passed all the courses of Semester I & II examination previously.**

वरील नमुद असलेल्या अध्यादेश अन्वये M.Com. (Sem.IV) च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यासंबंधीची पात्रता स्वयं स्पष्ट असून सुध्दा जे विद्यार्थी या शिक्षणक्रमाच्या सत्र १ व २ ची परीक्षा मे, २०१५ च्या परीक्षेपूर्वी उत्तीर्ण नसताना सुध्दा या शिक्षणक्रमाच्या सत्र ४ च्या परीक्षेला प्रविष्ठ झालेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात आलेत व सदर बाब दि. २७ ऑगस्ट, २०१५ रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत या राखीव ठेवण्यात आलेल्या निकालासंबंधी निर्णय घेण्याच्या विचारार्थ सादर करण्यात आली. सदर बैठकीत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

**मे, २०१५ मध्ये घेतलेल्या M.Com. (Sem.IV) च्या परीक्षेस प्रविष्ठ होण्यापूर्वी जे विद्यार्थी या शिक्षणक्रमाची सत्र १ व २ ची परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे ते या शिक्षणक्रमाच्या सत्र ४ च्या परीक्षेस बसण्यास पात्र नसून सुध्दा या परीक्षेस प्रविष्ठ झालेत, त्यांचे राखीव असलेले निकाल ते या शिक्षणक्रमाची सत्र १ व २ ची परीक्षा मे, २०१५ मध्ये घेतलेल्या परीक्षेस उत्तीर्ण झालेले असल्यास किंवा ऑक्टोबर, २०१५ मध्ये होणाऱ्या सत्र १ व २ च्या परीक्षांमध्ये प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झाल्यास त्यांचे मे, २०१५ मध्ये राखून ठेवलेले निकाल मे, २०१६ मध्ये घेण्यात येणाऱ्या या शिक्षणक्रमाच्या सत्र ४ च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेले आहेत असे गृहीत धरून त्यांचे निकाल जाहिर करण्यात यावेत**

**असे असले तरी, वरीलप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव आहेत ते विद्यार्थी या शिक्षणक्रमाच्या मे, २०१५ मध्ये घेतलेल्या सत्र १ व २ च्या परीक्षेस बसून ते उत्तीर्ण झालेले असतील ते विद्यार्थी या शिक्षणक्रमाच्या ऑक्टोबर, २०१५ मध्ये घेण्यात येणाऱ्या सत्र ४ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊ शकतात.**

वर नमुद असलेल्या सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

स्थळ : मुंबई.
दि. १५ ऑक्टोबर, २०१५.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

प्रमुख/संचालक, वाणिज्य विभाग, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नीत असलेले वाणिज्य विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम चालविणारे महाविद्यालये व सहायक कुलसचिव रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र.

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित
१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, फोर्ट, मुंबई — ३२.
३. मा.प्र. कुलगुरू, मा. संचालक, बी.सी.यु.डी., कुलसचिव व परीक्षा विभाग नियंत्रक यांचे स्विय सहायक
४. प्र. समन्वयक, युसीसी यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यानगरी संकेत स्थळावर तात्काळ प्रकाशित करावे